T3_L2_A8

PPT 2

## ❖ इंग्लंडविषयीचा असंतोष तीव्र झाला –

- इंग्लंडने वसाहतींवर निर्बंध लादायला  सुरुवात केली.
- यामुळे वसाहातींतील इंग्लंडविरोधी  भावना तीव्र होऊ लागली.
- वसाहतींवरील निर्बंध  इंग्लडने रद्द करावे आणि वसाहतींचा राज्यकारभार वसाहतींना करु दयावा अशी मागणी तेथील  नागरिक करत होते.

- या मागण्या मान्य करण्यासाठी इंग्लंडवर दडपण आणण्याचा प्रयत्न वसाहतींनी सुरु केला; परंतु वसाहतींच्या मागण्या इंग्लंडच्या सरकारला मान्य नव्हत्या.
- यामुळे तणाव वाढत गेला.
- इंग्लंडच्या मालावर वसाहतींनी बहिष्कार टाकला.
- इंग्रज अधिकाऱ्यांशी असहकार सुरु केला.
- कायदे मोडायला सुरुवात.

T3_L2_A9

## ❖ बोस्टन टी पार्टी –

- चीनमधून चहा आणून तो वसाहतीत विकण्याची मक्तेदारी इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीची होती.
- चहावर ब्रिटिश सरकारने कर बसवलेला असल्यामुळे तो विकत घ्यायचा नाही असा निर्धार वसाहतवाल्यांनी केला.
- चहाच्या पेटयांनी भरलेली ब्रिटिश जहाजे बोस्टन बंदरात उभी असताना १९ डिसेंबर १७७३ रोजी काही बंडखोर वसाहतकार रेड इंडियन्सचा वेश घेऊन जहाजांवर चढले आणि त्यांनी चहाच्या पेटया समुद्रात फेकून दिल्या.
- ही घटना इतिहासात “बोस्टन टी पार्टी म्हणून ओळखली जाते.
- ब्रिटिश सत्तेला हे उघड उघड आव्हान होते.
- त्यामुळे युध्दाचे सावट निर्माण झाले.

T3_L2_A9



T3_L2_A9



T3_L2_A9



T3_L2_A10

## ❖ युध्दाचे सावट –

- इंग्लंडने आपल्या फौजेच्या तुकड्या अमेरिकेत पाठवल्या न्यूयॉर्क हे त्याचे मुख्य केंद्र होते.
- बोस्टन येथेही सैन्य तैनात करण्यात आले.
- इंग्रज सैनिकांची उपस्थिती हा वसाहती व इंग्लंड यांच्यातील तणाव वाढवण्याचे महत्त्वाचे कारण होते.
- इंग्रज सैनिकांच्या पोषाखावरुन वसाहतवाले त्यांचा उल्लेख “लाल डगलाधारी” असा करत असत.
- ५ मार्च १७७० रोजी एका चकमकीत बोस्टन येथे पाच वसाहतवाले इंग्रज सैनिकांकडून मारले गेले.
- “बोस्टनची कत्तल” अशा शब्दात या घटनेचे वर्णन केले गेले.

T3_L2_A11

## ❖ वसाहतींच्या प्रतिनिधी परिषदा –

- इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये वसाहतींचे प्रतिनिधी नव्हते.
- त्यामुळे वसाहतींसंबधी कायदे करण्याचा व कर गोळा करण्याचा आणि लादण्याचा अधिकार इंग्लंडच्या पार्लमेंटला नाही, अशी स्पष्ट भूमिका वसाहतींनी घेतली होती.
- “ना प्रतिनिधी ,ना कर” अशी घोषणा त्यांनी केली.

- संघटितरित्या कृती करण्याची आता गरज आहे हे त्यांच्या लक्षात आले होते.
- यातून त्यांनी सर्व वसाहतींची परिषद ५ सप्टेंबर १७७४ रोजी बेंजामिन फ्रॅकलिन यांच्या अध्यक्षते खाली फिलाडेल्फिया” येथे भरवण्यात आली.
- तेथे जमलेल्या प्रतिनिधींनी जीवित मालमत्ता व स्वातंत्र्य हे आमचे जन्मसिध्द हक्क आहेत अशी घोषणा केली.
- वसाहतींना आपआपल्या फौजा उभारण्याचे आवाहन केले.
- दुसरी परिषद “फिलाडेल्फिया” येथेच भरवण्यात आली.

T3_L2_A11_F1

## ➢ स्वातंत्र्याचा जाहिरनामा –

- तिसरी परिषद फिलाडेल्फिया येथेच भरवली.
- या परिषदेमध्ये ४ जुलै १७७४ रोजी वसाहतींनी आपल्या स्वातंत्र्याचा जाहिरनामा घोषित केला.
- तो तयार करताना थॉमस जेफरसन याने महत्त्वाची भूमिका बजावली.
- "सर्व मानव समान आहे; जीवित, स्वातंत्र्य व सुखाचा शोध घेणे हे मानवाचे मुलभूत हक्क आहेत; या हक्कांची पायमल्ली करणारे सरकार बदलण्याचा किंवा उलथून टाकण्याचा अधिकार लोकांना आहे."
- असे जाहिरनाम्यात घोषित करण्यात आले.



थॉमस जेफरसन

T3_L2_A11_F1



T3_L2_A11_F1

- तेरा वसाहतींनी १७८९ साली अमेरिकेचे पहिले संघराज्य स्थापन केले.
- "अमेरिकेची संयुक्त संस्थाने ' या नावाने हा देश ओळखला जाऊ लागला.
- अमेरिका हे पहिले लोकशाही, प्रजासत्तक संघराज्य ठरले.
- जगात प्रथमच लिखित राज्यघटनेचा प्रयोग करण्यात आला.

उदा : अमेरिकेच्या राज्यघटने प्रमाणे आंबेडकरांनी ही भारताची लिखित राज्यघटना तयार केली.





THE CONSTITUTION OF INDIA

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all its citizens:

JUSTICE, social, economic and political;

LIBERTY of thought, expression, belief, faith and worship;

EQUALITY of status and of opportunity;
and to promote among them all

FRATERNITY assuring the dignity of the individual and the unity of the Nation;

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twenty-sixth day of November, 1949, do HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.

T3_L2_A12

## ❖ स्वातंत्र्ययुध्दाचे परिणाम –

- लोकशाही सरकार अस्तित्वात आले.
- प्रत्येक मानव समुहाला अन्यायाविरुध्द लढण्याचा अधिकार.
- मानवाच्या मुलभूत हक्कांसाठी जगात अनेक ठिकाणी लढे.
- जगातील अनेक देशांना लोकशाहीची प्रेरणा.
- जॉर्ज वॉशिंग्टन यांनी पहिला राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ.

T3_L2_A13

## ❖ जॉर्ज वॉशिंग्टन (इ.स. १७३२ ते १७९९) –

- जॉर्ज वॉशिंग्टन हा व्हर्जिनियातील मळेवाला होता.
- त्याने सप्तवार्षिक युध्दात तसेच फ्रेंचांशी व रेड इंडियन यांच्याशी झालेल्या अनेक लढायांत भाग घेतला.
- अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दाचे नेतृत्व त्याच्याकडे होते.
- अमेरिकन संघराज्याचे ते पहिले राष्ट्राध्यक्ष झाले.
- याने न्यायव्यवस्था व अर्थव्यवस्था यात सुधारणा केली.
- त्याने अमेरिकेला जगातील एक शक्तिशाली राष्ट्र बनवले.



जॉर्ज वॉशिंग्टन

## ❖ थॉमस पेन यांचे वैचारिक लेखन व त्याचा परिणाम –

- थॉमस पेन या क्रांतिकारक विचाराच्या इंग्रज लेखकाने “कॉमन सेन्स” (व्यवहारज्ञान पुस्तिका) व “राईटस ऑफ मॅन” (मानवी हक्क ) हा ग्रंथात क्रांतिकारक विचार मांडले.
- थॉमस पेन हा मानवी हक्कांच्याबाबत भाष्य करणारा जगाच्या इतिहासातील पहिला विचारवंत होता.
- मानवी अधिकारांचे शास्त्रशुध्द विवेचन त्याने मानवी हक्क या ग्रंथात केले.



थॉमस पेन

T3_L2_A14

- स्वातंत्र्याची इच्छा बाळगणाऱ्या लोकांना मानवी हक्क या ग्रंथाने प्रेरणा दिली.
- या यशस्वी लढयाने इंग्लंडच्या वसाहतवादाला जबर धक्का दिला.
- मानवाचे काही मूलभूत अधिकार असतात, ते हिरावून घेण्याचा कोणत्याही शासकाला अधिकार नसतो, मात्र जुलमी शासकाला पदच्युत करण्याचा प्रजेला अधिकार असतो, ही क्रांतीकारी तत्त्वे वसाहतींच्या स्वातंत्र्यलढ्याने प्रस्थापित केली.

## ❖ विचारवंतांची कामगिरी –

- अमेरिकन राज्यक्रांती घडवून आणण्यात विचारवंतांची कामगिरी महत्त्वाची ठरली.
- इंग्लंडमधील जॉन लॉक, मिल्टन, थॉमस पेन, फ्रान्समधील रुसो, व्हॉल्टेअर, अमेरिकेतील जॉर्ज मॅसन, थॉमस जेफरसन या विचारवंतांनी नैसर्गिक हक्कांचा पुरस्कार करुन त्यांनी स्वातंत्र्याची मागणी केली.
- या तत्त्ववेत्त्यांनी आपल्या क्रांतिकारी विचारातून अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दाला अनुकूल वातावरण तयार केले.

T3_L2_A17

# Assessment

❑ योग्य जोड्या लावा.

| अ गट | ब गट |
|---|---|
| १. मानवी हक्क | १. १९ डिसेंबर १७७३ |
| २. बोस्टन टी पार्टी | २. लिखित राज्यघटना |
| ३. अमेरिकेची संयुक्त संस्थाने | ३. थॉमस पेन |
| ४. जॉर्ज वॉशिंग्टन | ४. थॉमस जेफरसन |
| | ५. राष्ट्राध्यक्ष |

1 – 3 , 2 – 1, 3 – 2 , 4 - 5

T3_L2_A16

# Exercises

- अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहिरनामा मिळवून त्याची माहिती व विचारवंतांची चित्रे संग्रहित करा.

- खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१. अमेरिकन स्वातंत्र्यात विचारवंतांनी केलेली कामगिरी तुमच्या शब्दात लिहा.

२. अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दाचे परिणाम लिहा.